राज्य सांस्कृतिक निधीतून संस्थाना अर्थसहाय्य करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. रासांनि-२०१९/प्र.क्र.३२/अर्थसं.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. मसांधो २०१०/ रासानि २०११/प्र.क्र.१२२/अर्थस. दि. ९ ऑगस्ट, २०१२.

२) शासन निर्णय पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. मसांधो २०१०/ रासानि २०११/प्र.क्र.१२२/अर्थस. दि. ३० जानेवारी, २०१३.

३) प्र. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ रोजीचे पत्र.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त राज्य सांस्कृतिक धोरण २०१० जाहिर करण्यात आले आहे. त्यानुषंगाने, उपर्निर्दिष्ट संदर्भ क्र. १ अन्वये "राज्य सांस्कृतिक निधी" स्थापन करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार या निधीचा विनियोग कोणत्या बाबींसाठी करावा, याबाबत उपर्निर्दिष्ट संदर्भ क्र. २ अन्वये नियमावली ठरविण्यात आली आहे. त्यानुषंगाने, छाननी व संनियंत्रण समितीने शिफारस केलेल्या संस्थांना अर्थसहाय्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : -

राज्य सांस्कृतिक निधीतून खालील संस्थाना अर्थसहाय्य देण्याबाबत या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव	प्रत्यक्ष मंजूर निधी
१.	We Crop पुणे	रु. ३.०० लक्ष
२.	वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र, नाशिक	रु. २.०० लक्ष
	एकूण	**रु. ५.०० लक्ष**

२. सदर खर्च महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक निधी, मुंबई यात उपलब्ध असलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०९१८१८३२१५५१२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Vilas Ramrao Thorat

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b747ae11457103a0cfb9a57fc6ce6, serialNumber=cb03c92b399cc89310bf1378c184d97a4b7b9b98e926ea8e71dd7bc9cb273631, cn=Vilas Ramrao Thorat
Date: 2019.09.20 12:50:19 +05'30'

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. उपसचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. संचालक,सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई तथा सदस्य सचिव, राज्य सांस्कृतिक निधी संनियंण समिती

यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर संस्थांना निधी वितरीत करण्याबाबतची कार्यवाही करावी.

५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १ महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १ महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २ महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २ महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११.निवड नस्ती, अर्थसंकल्प.